ePaper

# शिवसेना ठाकरे गटाला मोठं खिंडार, एकनाथ शिंदेंचा ठाकरेंना धक्का

| वर्ष - 8 | अंक - 353 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- करूण-सुंदरच्या कृतीने जिंकली मनं!
- क्रिकेटने दिलेल्या दुसऱ्या संधीचं सोनं !
- अमेरिकेचा भारतावर टॅरिफ बॉम्ब!
- मला काही फरक पडत नाही : ट्रम्प


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 1 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याचा तब्बल १७ वर्षांनी निकाल ; सर्व सात आरोपी निर्दोष

# ‘भगव्या दहशतवादा’ चा बागुलबुवा!

## प्रज्ञासिंग ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, मेजर रमेश उपाध्याय यांची निर्दोष मुक्तता

। मुंबई / मालेगाव । प्रतिनिधी । महाईन्यूज


**मालेगावमध्ये झालेल्या बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल तब्बल १७ वर्षांनी देण्यात आला. या प्रकरणातील सर्व सात आरोपींची निर्दोष मुक्तता झाली असून काँग्रेसच्या नेत्यांनी मांडलेला ‘भगव्या दहशतवादा’ चा मुद्दा खोटा ठरला असून त्याच्या बागुलबुवाचा फुगा फुटला आहे. ‘फेक नॅरेटिव्ह’ चालविल्याबद्दल काँग्रेसच्या नेत्यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.**



प्रज्ञासिंह ठाकूर



लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित




मेजर रमेश उपाध्याय (निवृत्त)



अजय राहिरकर



सुधाकर चतुर्वेदी



समीर कुलकर्णी

### कोण होते सात आरोपी ?

या खटल्याचा निकाल देताना न्यायाधीशांनी तपास यंत्रणांवर ताशेरे ओढले असून कोणाविरुद्धही भक्कम पुरावे मिळाले नसल्याचे सांगितले आहे. पुराव्या अभावी सर्वांना निर्दोष सोडण्यात आले आहे. त्यामध्ये माजी खासदार साध्वी प्रज्ञा सिंग ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, मेजर रमेश उपाध्याय, समीर कुलकर्णी ऊर्फ चाणक्य समीर, अजय ऊर्फ राजा राहिरकर, स्वामी अमृतानंद देवतीर्थ, सुधाकर ओंकारनाथ चतुर्वेदी यांना निर्दोष सोडण्यात आले आहे.

### स्फोटामध्ये 6 जणांचा मृत्यू

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव या शहरात मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणावर राहतो. या शहरांमध्येच हा स्फोट झाला होता. दि. २९ सप्टेंबर २००८ रोजी तेथील मुस्लिम समाज रमजान महिना तर हिंदू समाज नवरात्रोत्सव साजरा करण्यात व्यस्त होते. रात्री ९.३५ वाजता तेथील भिक्खू चौकात हा बॉम्बस्फोट झाला. सर्व परिसरात धूर आणि लोकांच्या किंकाळ्या तसेच रक्ताचे पाट वाहू लागले. या दुर्दैवी घटनेमध्ये सहा जण जागीच ठार झाले, तर १०० पेक्षा जास्त लोक जखमी झाले. तब्बल १७ वर्षे चाललेल्या या खटल्यात न्यायालयाने दि. १९ एप्रिल रोजी हा निकाल राखून ठेवला आणि निकालाची तारीख आठ मे निश्चित करण्यात आली. त्यादिवशी सर्व आरोपींना हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते. पण, नंतर दि. ३१ जुलै ही तारीख निश्चित केली आणि हा महत्त्वपूर्ण निकाल देण्यात आला.

### काँग्रेसची जातीयवादी भूमिका

देशात साधारण १९९० नंतर अनेक बॉम्बस्फोट झाले, त्यातील आरोपी हे मुस्लिम असल्याचे निष्पन्न होत होते. प्रत्येक मुस्लिम हा दहशतवादी नसला, तरी प्रत्येक दहशतवादी हा मुस्लिम असतो, असा एक संदेश समाजात पसरत होता आणि अशातच मालेगाव या मुस्लिमबहुल शहरात बॉम्बस्फोट झाला. यावेळी राज्यात आणि देशात काँग्रेसचे सरकार होते आणि आरोपी म्हणून पकडण्यात आलेले सर्व जण कट्टर हिंदुत्ववादी होते.

### भगव्या दहशतवादाची घोषणा

मालेगाव स्फोटाची संधी मिळतात काँग्रेसच्या सर्व नेत्यांनी ‘भगव्या दहशतवादा’ ची घोषणा करून टाकली. मुस्लिम समाजाचे लांगुनचालन करण्यात व्यस्त असलेले काँग्रेस नेते म्हणू लागले, की फक्त मुस्लिमच नव्हे तर हिंदू सुद्धा दहशतवादी आहेत, हे आरोपींच्याकडे पाहिले की सिद्ध होते.

हा आरोप करण्यामध्ये केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे, पी. चिदंबरम्, शिवराज पाटील, दिग्विजय सिंग हे आघाडीवर होते. पण या निकालामुळे ‘भगव्या दहशतवादा’ चा ‘फेक नॅरेटिव्ह’ पसरवणारे काँग्रेस नेते तोंडावर पडले आहेत. काँग्रेसने तमाम देशवासीयांची माफी मागावी, अशी मागणी होऊ लागली आहे.

### न्यायाधीश नेमके काय म्हणाले ?

दहशतवादाला कोणताही रंग, धर्म नाही, मालेगाव बॉम्बस्फोट निकाल देताना विशेष एनआयए न्यायाधीशांनी केलेली टिप्पणी एकच खळबळ उडवून गेली आहे. विशेष एनआयए न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी यावेळी म्हणाले, की दहशतवादाला कोणताही रंग, धर्म नाही, मालेगाव बॉम्बस्फोट निकाल देताना विशेष एनआयए न्यायाधीशांची टिप्पणी त्यामुळे बरेच काही सांगून गेली.

## कोणावर काय आरोप होते ?

‘अभिनव भारत’ या हिंदू कट्टरपंथी संघटनेचा बॉम्बस्फोट घडवण्यात सहभाग होता, असा दावा करण्यात आला होता. प्रज्ञासिंग ठाकूर यांच्यावर कटात सहभागी असल्याचा आरोप होता. मेजर रमेश उपाध्याय (निवृत्त) हे पुण्याचे रहिवासी असून त्यांच्यावर बॉम्ब बनवण्याचे प्रशिक्षण देण्याचा आरोप होता. समीर कुलकर्णी ऊर्फ चाणक्य समीर हे देखील पुण्याचे असून त्यांच्यावर बॉम्ब बनवण्यासाठी साहित्य मिळवण्यास मदत केल्याचा आरोप होता. अजय ऊर्फ राजा राहिरकर हे बॉम्बस्फोटात सहभागी असलेल्या अभिनव भारतचे पुणे येथील कोषाध्यक्ष असल्याने त्यांना आरोपी बनवण्यात आले होते. लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांना मुख्य कट्टरपंथी ठरवून ते या कटाचे प्रेरक असल्याचे तसेच आरडीएक्स मिळवण्यास मदत केल्याचे आरोप होते. स्वामी अमृतानंद देवतीर्थ हे मूळचे जम्मू-काश्मीरचे असून ते स्वयंघोषित शंकराचार्य आहेत असा दावा करत त्यांनी बॉम्बस्फोटाचा कट रचल्याचा आरोप होता. सुधाकर ओंकारनाथ चतुर्वेदी ऊर्फ चाणक्य सुधाकर हे ठाण्याचे असून त्यांच्याकडे शस्त्रे सापडली असा दावा एटीएसने केला होता. तसेच त्यांच्यावरही कटात सहभागी असल्याचा आरोप होता.

### सुशील कुमार शिंदे यांचा जोवईशोध..

राज्यात गेल्या १७ वर्षांपासून सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या आणि तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी ‘हिंदू दहशतवाद’ हा शब्दप्रयोग केल्याने सर्वाधिक चर्चा झालेल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी निकाल देण्यात आला. बॉम्बस्फोट झाला होता, हे सरकारी पक्षाला सिद्ध करता आले असले, तरी केवळ संशयाच्या आधारे आरोपींना शिक्षा देणे योग्य नसल्याचे सांगत न्यायालयाकडून सर्वांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. दुसरीकडे राष्ट्रीय तपास यंत्रणेने या सर्व आरोपींविरोधात २०१६ मध्ये आरोपपत्र दाखल केले होते. या सर्व आरोपींना मृत्यूदंडाची मागणी करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने पंचनामा ते संपूर्ण तपास प्रक्रियेमध्ये अनेक शंका व्यक्त करत केवळ संशयाच्या आधारे आरोपींना शिक्षा सुनावणे योग्य नसल्याचे घोषित केले. सगळ्या आरोपींना संशयाचा फायदा असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

### मोहन भागवत यांच्या अटकेचे आदेश

या तपासाच्या दरम्यान एटीएस चे पोलीस अधिकारी असलेल्या मेहबूब मुजावर यांनी पत्रकारांना सांगितले की या स्फोटाच्या संदर्भात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना अटक करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यासाठी माझ्याबरोबर दहा पोलीस अधिकाऱ्यांचे नियुक्ती करण्यात आली होती आणि तत्कालीन ज्येष्ठ पोलीस अधिकारी परमवीरसिंग यांनी हे आदेश दिले होते. दरम्यान, न्यायाधीशांनी या खटल्याच्या तपासामधील अनेक त्रुटींवर बोट ठेवले.

## गणेशोत्सव — अखिल मंडई मंडळ आणि भाऊसाहेब रंगारी ट्रस्टचा निर्णय !

# यंदा विसर्जन मिरवणूक लवकर संपणार!

## प्रशासनावरील ताण कमी होणार

।पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सायंकाळनंतर विसर्जन मिरवणुकीत सहभागी न होता, या वर्षीपासून मानाचे पाच गणपती टिळक पुतळ्यापासून मार्गस्थ झाल्यानंतर त्या पाठोपाठ मिरवणुकीत सहभागी होण्याचा निर्णय श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट आणि अखिल मंडई मंडळ या मंडळांनी घेतला आहे. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टचे विश्वस्त पुनीत बालन आणि अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. संजीव जावळे, संजय मते, विश्वास भोर या वेळी उपस्थित होते.**




बालन म्हणाले, 'ग्रहणकाळ रविवारी (७ सप्टेंबर) दुपारी १२ वाजून ३७ मिनिटांनी सुरू होत आहे. किमान त्या आधी अर्धा तास सर्व गणेशोत्सव मंडळाच्या मूर्ती मंदिरात नेणे आवश्यक आहे. याकरिता मिरवणूक लवकर संपविणे आवश्यक असून, मानाचे पाच गणपती टिळक पुतळा चौकातून मार्गस्थ झाल्यानंतर त्या पाठोपाठ मिरवणुकीत सहभागी होण्याचा निर्णय अखिल मंडई मंडळ आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टने घेतला आहे. याच प्रकारे सर्व गणेशमंडळांनी सहकार्य केल्यास पोलीस आणि प्रशासन यंत्रणेवरील ताण कमी होण्यास मदत होईल.''मागील तीन वर्षे पोलिसांनी दिलेल्या वेळेत सायंकाळी सात वाजता 'श्रीं'ची आरती करून मिरवणुकीत सामील होण्यासाठी तयार असतो. मात्र, गेली काही वर्षे पोलीस प्रशासनाने शब्द पाळला नाही. सायंकाळी मिरवणुकीत सामील होण्यासाठी तयार असूनही आम्हाला वेळेवर सहभागी करून घेण्यात आले नाही. त्या अनुभवामुळे यंदा विसर्जन मिरवणुकीत लवकर सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व गणेशोत्सव मंडळांनी यंदा रविवारी दुपारी बारापूर्वीच विसर्जन मिरवणूक संपवावी,' असे आवाहन थोरात यांनी केले.विसर्जन मिरवणुक लवकर संपण्यासाठी ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून मिरवणुकीतील वाद्य पथके कमी करण्यावर भर देण्यात येणार आहे. मानाच्या पाच गणपती मंडळांनाही त्याबाबत विनंती करण्यात येणार आहे.यंदा नेहमीप्रमाणे अनंत चतुर्दशीला (६ सप्टेंबर) गणेश विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होईल. मात्र, चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशीच, रविवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास खग्रास चंद्रग्रहण सुरू होत आहे. ग्रहणकाळात देवतांच्या

## देवतांच्या मूर्ती झाकून ठेवाव्या

आहे. मानाच्या पाच गणपती मंडळांनाही त्याबाबत विनंती करण्यात येणार आहे.यंदा नेहमीप्रमाणे अनंत चतुर्दशीला (६ सप्टेंबर) गणेश विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होईल. मात्र, चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशीच, रविवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास खग्रास चंद्रग्रहण सुरू होत आहे. ग्रहणकाळात देवतांच्या मूर्ती झाकून ठेवाव्या लागतात.

मूर्ती झाकून ठेवाव्या लागतात. त्यामुळे रविवारी दुपारी बारा वाजण्यापूर्वीच सर्व गणेशमूर्तीचे विसर्जन पूर्ण होणे आवश्यक आहे.वारी (७ सप्टेंबर) दुपारी १२ वाजून ३७ मिनिटांनी सुरू होत आहे. किमान त्या आधी अर्धा तास सर्व गणेशोत्सव मंडळाच्या मूर्ती मंदिरात नेणे आवश्यक आहे. याकरिता मिरवणूक लवकर संपविणे आवश्यक असून, मानाचे पाच गणपती टिळक पुतळा चौकातून मार्गस्थ झाल्यानंतर त्या पाठोपाठ मिरवणुकीत सहभागी होण्याचा निर्णय अखिल मंडई मंडळ आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टने घेतला आहे. याच प्रकारे सर्व गणेशमंडळांनी सहकार्य केल्यास पोलीस आणि प्रशासन यंत्रणेवरील ताण कमी होण्यास मदत होईल.''मागील तीन वर्षे पोलिसांनी दिलेल्या वेळेत सायंकाळी सात वाजता 'श्रीं'ची आरती करून मिरवणुकीत सामील होण्यासाठी तयार असतो. मात्र, गेली काही वर्षे पोलीस प्रशासनाने शब्द पाळला नाही. सायंकाळी मिरवणुकीत सामील होण्यासाठी तयार असूनही आम्हाला वेळेवर सहभागी करून घेण्यात आले नाही. त्या अनुभवामुळे यंदा विसर्जन मिरवणुकीत लवकर सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व गणेशोत्सव मंडळांनी यंदा रविवारी दुपारी बारापूर्वीच विसर्जन मिरवणूक संपवावी,' असे आवाहन थोरात यांनी केले.विसर्जन मिरवणुक लवकर संपण्यासाठी ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून मिरवणुकीतील वाद्य पथके कमी करण्यावर भर देण्यात येणार

# 'पीएमआरडीए'च्या परिसरात विकासाला गती

## राज्य सरकारकडून पाच नगर रचना योजनांना मंजुरी

।पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) तयार केलेल्या चार नगर रचना योजनांना (टाऊन प्लॅनिंग स्कीम- टीपी) राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. तसेच पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील फुरसुंगी योजनेलाही मान्यता मिळाली आहे.**




त्यामुळे पीएमआरडीएच्या हद्दीतील गावालगतच्या विकासाला गती मिळणार असून, टीपी स्कीममुळे ६.८ किलोमीटर लांबीचा रिंगरोडचेही विकसन करता येणार आहे. पीएमआरडीएच्या हद्दीतील गावांचा नियोजनबद्ध विकास व्हावा आणि रिंगरोडसह अन्य विकासकामांना गती मिळावी, यासाठी टीपी स्कीम राबविण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. त्यानुसार चार टीपी स्कीमचे प्रस्ताव मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात आले होते. या चारही प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे. वडाचीवाडी, औताडे-हांडेवाडीसाठी प्रत्येकी एक-एक आणि होळकरवाडीसाठी दोन अशा एकूण चार टीपी स्कीमला मंजुरी देण्यात आली. तसेच

## टीपी स्कीमसाठी सूचना जाहीर

पीएमआरडीए अंतर्गत ६५ मीटर रुंद वळण रस्त्याचे क्षेत्र मिळविण्यासाठी एकूण १५ टीपी स्कीम घोषित करण्याबाबतची सूचनाही जाहीर करण्यात आली आहे. हवेली तालुक्यातील वडकी, मुळशी तालुक्यातील माण, धामणे, गोदुंबरे, दारुंबरे- साळुंब्रे १ दारुंबरे-साळुंब्रे-२, सांगवडे, नेरे, बावधन बुद्रुक या गावातील नगर योजनांचा समावेश आहे.

पुणे महापालिकेच्या हद्दीतील फुरसुंगीमधील योजनेचाही यामध्ये समावेश आहे. राज्य शासनाकडून या योजनांना मंजुरी मिळाल्यामुळे पुढील प्रक्रिया पीएमआरडीए प्रशासनाकडून तातडीने हाती घेण्यात आली आहे.दरम्यान, योजनांना मंजुरी मिळाल्यामुळे चर्चा करून रस्ते ताब्यात घेण्याचा मार्गही मोकळा झाला असून, नव्याने प्रस्तावित केलेल्या पंधरा योजनांसाठीची जाहीर सूचनाही प्रशासनाकडून देण्यात आली आहे. लोकप्रतिनिधी, नागरिक आणि शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन आराखडे निश्चित करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे.


**Elevated Corridor** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सकारात्मक भूमिका

# नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर भूसंपादनासाठी राज्य सरकारचा निधी!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

। पिंपरी-चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पुणे- नाशिक महामार्गावरील वाहतूक समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. नाशिक फाटा ते खेड या भागातील रुस्ता रुंदीकरणाला (एलिव्हेटेड कॉरिडॅार) चालना देण्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. त्या अनुशंगाने राज्य शासनाकडून भूसंपादनासाठी सुमारे 600 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात येणार आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. याबाबत लवकरच निर्णय होईल, अशी माहिती भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली.**



भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत राष्ट्रीय महामार्ग क्र. 48 वरील नाशिक फाटा ते खेड या दरम्यान आठ पदरी उन्नत मार्ग (ELEVATED CORRIDOR) चे मोठे काम हाती घेतले आहे. त्यासाठी निविदा काढण्यात आली आहे. मात्र, भूसंपादनाअभावी निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. यासाठी 100 टक्के भूसंपादन होणे आवश्यक आहे. त्याशिवाय काम सुरू करता येणार नाही, अशी अट घालण्यात आली आहे. पण, पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे भूसंपादनाचे काम रखडले आहे.

दरम्यान, आमदार महेश लांडगे यांनी विधानसभा अधिवेशनामध्ये राज्य सरकारचे या महत्त्वपूर्ण मुद्याकडे लक्ष वेधले होते. पुणे, पिंपरी-चिंचवडसाइी अत्यंत आवश्यक असलेल्या या पुणे-नाशिक महामार्गाच्या कामासाठी भूसंपादन करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी वित्तीय सहाय्य मिळावे. या करिता पिंपरी-चिंचवड महानगरपालिक आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या दोन्ही अस्थापनांनी राज्य सरकारच्या नगर विकास विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे आमदार लांडगे यांनी सातत्त्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्याला यश मिळताना दिसत आहे.

### राज्य सरकारकडे काय आहे प्रस्ताव?

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नाशिक फाटा ते खेड दरम्यानचा रस्त्यासाठी 1 लाख 23 हजार 843 चौरस मीटर भूसंपादनाकरिता 262 कोटी 79 लाख 16 हजार 771 रुपये इतके वित्तीय सहाय्य मिळावे, असा प्रस्ताव आहे. तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील 14.1 हे. पैकी 10.5013 हे. क्षेत्राचे भूसंपादन व या प्रकल्पाचा महाराष्ट्र शासनामार्फत प्राप्त होणाऱ्या राज्य वस्तू व सेवा कर (GST) आणि स्वामित्व शुल्क असे 288 कोटी रुपये वित्तीय सहाय्य राज्य शासनामार्फत उपलब्ध होण्याबाबत नगर विकास विभागाला प्रस्ताव सादर केला आहे. त्यानंतर नाशिक फाटा ते खेड आठ पदरी उन्नत मार्गाच्या (ELEVATED CORRIDOR) रॅम्पचे आणि 65 मीटर रिंग रोडसाठी म्हणजे सोळू ते निरगुडी (लोहगाव) मार्गाचे काम सुरू करता येणार आहे.

“ नाशिक फाटा ते खेड या भागातील रुस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादनकामी निधी मिळावा, असा प्रस्ताव पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने राज्य सरकारला पाठवला आहे. त्याला मान्यता द्यावी, याकामी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली भाजपा महायुती सरकारने सकारात्मक भूमिका घेतली. वाहतूक समस्यांबाबत राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याशी बैठक झाली. त्यानंतर आज विभागीय आयुक्तांकडे सविस्तर बैठक झाली. भूसंपादन निधीचाही प्रश्न मार्गी लागणार आहे. आता वाहतूक सक्षम होण्यास मदत होईल आणि पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा मिळेल, असा विश्वास आहे.
**- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

# औद्योगिक पार्क उभारून उद्योजकांचे पुनर्वसन करा

## चिखली कुदळवाडी येथील कारवाईनंतर पिंपरी चिंचवड लघुउद्योजक संघटनेचे मागणी

। पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: कुदळवाडी चिखली येथील लघु उद्योजकांसाठी महानगरपालिकेने औद्योगिक पार्क बनवून उद्योजकांचे पुनर्वसन करावे. उद्योजकांना महापालिका व महाराष्ट्र शासनाने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी लघु उद्योजक संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी विधानसभा उपसभापती अण्णा बनसोडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.**



पिंपरी चिंचवड लघुउद्योजक संघटनेच्या शिष्टमंडळाची बैठक विधानभवन मुंबई येथे संपन्न झाली. यावेळी संघटनेचे सचिव जयंत कड उपाध्यक्ष संजय जगताप,संचालक संजय सातव,नवनाथ वायाळ, भरत नरवडे , पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे ,महावितरण मुख्य अभियंता सुनील काकडे, अधिक्षक अभियंता सिंहाजी गायकवाड, कार्यकारी अभियंता अतुल देवकर उपस्थित होते. यावेळी लघुउद्योजकांनी पिंपरी चिंचवड परिसरामध्ये काम करताना येत असलेल्या अडचणी, नुकतेच झालेल्या चिखली कुदळवाडी येथील कारवाईनंतर उद्योजकांच्या पुनर्वसनाचा निर्माण झालेला प्रश्न याबाबत सविस्तर चर्चा केली.

पिपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रात कुदळवाडी चिखली हा परिसर समाविष्ट असून या परिसरात लहान मोठे लघुउद्योजक आपले व्यवसाय करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करून कामगारांचा व आपला उदरनिर्वाह करत होते. परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अचानकपणे बांधकाम कारवाई करण्याकरिता या परिसरात दहशतवादी व रोहिंग्यांचे वास्तव्य आहे तसेच या ठिकाणापासून नदी प्रदूषण होत आहे. असे भासवून बांधकाम निष्कासन कारवाई करण्यात आली परंतु या ठिकाणी जवळपास सर्वच उद्योग हे इंजिनिअरिंगची कामे करत होते. या उद्योगापासून कोणत्याही प्रकारचे नदी प्रदूषण होत नव्हते, तसेच या ठिकाणी कोणीही दहशतवादी किंवा रोहिंगे सापडले नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 12 जानेवारी 2025 पासून सदर बांधकामे 15 दिवसाची नोटिस मुदत देऊन स्वतः काढून घेण्यास सांगितले होते, परंतु इतक्या कमी वेळेत एवढा मोठा सेटअप हलविणे शक्य नव्हते. 8 फेब्रुवारी 2025 पासून सकाळी 6 वाजला सरसकट कारवाई चालू करण्यात आली.

### विधानसभा उपसभापतींना दिले निवेदन

पीएमआरडीए अंतर्गत ६५ मीटर रुंद वळण रस्त्याचे क्षेत्र मिळविण्यासाठी एकूण १५ टीपी स्कीम घोषित करण्याबाबतची सूचनाही जाहीर करण्यात आली आहे. हवेली तालुक्यातील वडकी, मुळशी तालुक्यातील माण, धामणे, गोदुंबरे, दारुंबरे- साळुंब्रे १ दारुंबरे-साळुब्रे-२, सांगवडे, नेरे, बावधन बुद्रुक या गावातील नगर योजनांचा समावेश आहे.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



'स्टेट'मेंन्ट
राहुल जगताप

### आपण भगवंताचे झालो तरच सुखी होऊ.

आपल्याला साधायचे काय हे ध्यानात धरले पाहिजे. परमात्मा साधायचा आहे, आणि शरीर आणि प्रपंच ही साधने आहेत, हे पक्के समजावे. आपण साधनाला साध्य आणि साध्याला साधन मानतो, म्हणून आपले चुकते. एका गृहस्थाला मुलाबाळांसह मुंबईला जायचे होते. आता आगगाडीत बसायला मिळेल या आनंदात मुले गाडीत बसली, पण मुंबईस जाण्यासाठी गृहस्थ गाडीत बसला. गाडीतून उतरताना मुलांना वाईट वाटले, त्या गृहस्थाला नाही तसे वाटले. वसिष्ठांनी रामाला सांगितले की, " रामा, तू प्रपंचात वागताना अंतर्यामी नि:संग रहा. " ' मी देह नसून आनंदरूप आत्मा आहे, नि:संग आहे, ' ही दृढ भावना ठेवून प्रपंच करावा. जमीन सोडून कुणाला राहाता येत नाही, त्याप्रमाणे प्रपंच कुणालाच टाकता येत नाही. पण त्यात 'राम कर्ता' मानून वागणारा तो पारमार्थिक, ' मी कर्ता ' असे मानून वागणारा तो प्रापंचिक. ' मी कर्ता ' असे म्हणूनही जर प्रपंच दु:खरूप राहतो, सुखरूप होत नाही, तर त्याचा कर्ता मी नाही हे सिद्धच झाले ! प्रपंच हा अर्धवटच आहे, पूर्ण फक्त राम आहे. मिठाचे पोते कितीही धुतले तरी त्याचा खारटपणा जात नाही, तसे प्रपंचाचे आहे. म्हणून परमार्थ हे ध्येय ठेवून सुलभ असे साधन जे नामस्मरण, ते अखंड करावे. प्रपंचात आपण किती कष्ट करतो ! तितका मोबदला मिळत नाही, तरीही कष्ट करतो. परमार्थात तसे नाही. परमार्थ जितकाजितका करावा तितकेतितके समाधान अधिकाधिक असते. आयुष्यभर प्रपंच केला तर मृत्युसमयीही प्रपंचच आठवेल. म्हणून प्रपंचाचा हव्यास धरू नये. प्रपंचातल्या वस्तू आज ना उद्या जाणार हे जाणून, त्यांच्याबाबत अलिप्तपणाने वागावे. ही वृत्ती अभ्यासाने आणि वारंवार विचाराने वाढवावी. प्रपंचात, प्राप्त झाले त्याचा हर्ष न करावा, गेल्याचा शोक न करावा. देह प्रारब्धावर टाकावा. हे साधायला एक मोठी परिणामकारक आणि सोपी युक्ती आहे : आपण रामाचे व्हावे. राम ठेवील तसे समाधानाने राहावे. हे सर्व विश्व आणि अखिल प्रपंच ईश्वराचा आहे; तो ज्याचा त्याला देऊन टाकून मोकळे व्हावे.

सर्व ईश्वराचे आहे, माझे काही नाही, असे समजणे म्हणजे ईश्वरार्पण करणे आहे. आपण भगवंताचे झालो तर सुखी होऊ, नाहीतर दु:खी होऊ. धान्यातले दगड, माती, पाकड, निवडून बाजूला काढून, धान्य जे सार, ते घ्यावे; त्याचप्रमाणे, अहंकाराचे खडे, ममत्वाची माती आणि विकारांचे पाकड, आत्मस्वरूप परमार्थात मिसळल्याने दु:खरूप प्रपंच होतो. ते प्रपंचातून निवडून टाकले म्हणजे जे उरेल ते सारे सुखच ! बोधवचन:- 'रामा, सर्व तुझेच आहे, तू देशील ते घेईन.' अशी भावना ठेवावी. यानेच अत्यंत समाधान होते.

# म्हाताऱ्या बैलाची कथा, एकनाथ खडसेंची व्यथा!



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**खेडेगावात घरोघरी दिसणारी एक गोष्ट आहे. जोपर्यंत घरातील दावणीला असणारा बैल औत ओढत असतो, तोपर्यंत त्याची प्रचंड काळजी घेतली जाते. इतकी की, दररोजची पेंड, चारा, आंबील, सणासुदीला कणकीचा गोळा, गुळ..त्याची जबरदस्त चैन असते ! पण, एकदा का तो बैल म्हातारा झाला, औत ओढायचा थांबला, जागेवर बसला म्हणजे थोडक्यात, बिन कामाचा झाला, की मग त्याचे हाल कुत्रे सुद्धा खात नाही ! त्याला हिरवा चारा तर सोडाच, पण वेळेवर पाणी मिळायची मारामार ! आजच्या राजकारणात ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांची ती अवस्था झाली आहे, म्हणून या म्हाताऱ्या बैलाची गोष्ट आठवली..!**



### खडसे यांच्या जावयाचे उपद्रव्याप..

एकेकाळचे भाजपाचे ज्येष्ठ नेते, मुख्यमंत्री पदाचे दावेदार, नंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांची सध्या फार बिकट अवस्था आहे. त्यांच्या शब्दालाच काय, त्यांनाच कोठे मान मिळेनासा झाला आहे. त्यांचे जावई आणि रोहिणी खडसे यांचे पती, प्रांजल खेवलकर पुण्यातल्या रेव्ह पार्टीत पोलिसांना रंगेहाथ सापडले, हे खडसे यांचे दुर्दैव! केवळ जळगाव जिल्हा सोडून इतरत्र खेवलकर, खडसे आडनावा भोवती पिंगा धरून लोकांनी उगीचच बदनामीचे त्यांच्या नावाचे ढोलताशे जोरजोरात बडवायला सुरुवात केली. त्यात मीडिया आघाडीवर होती आणि आहे !

### नवल इतरांना, खडसेंच्या जिल्ह्यात नाही!

नवल इतरांना वाटले, मुक्ताईनगर तसेच जळगाव जिल्ह्यात मात्र एकालाही खडसे, खेवलकर यांच्या या दुष्कृत्याचे अजिबात आश्चर्य वाटलेले नाही, विशेष म्हणजे जावई व्यसनी, व्यभिचारी निघाल्याने त्यानंतर एकनाथ खडसे कमालीचे अस्वस्थ दिसत आहेत, रोहिणी खडसे देखील तोंड लपवत फिरत आहेत, हाही लोकांनी त्याचप्रमाणे, मीडियाने करवून घेतलेला मोठा गैरसमज आहे.

### 'राजा भिकारी माझी टोपी चोरली..'

एका गोष्टीमध्ये उंदीर राजाच्या नावाने ओरडत असतो. 'राजा भिकारी..' म्हणून ओरडत असतो. आपली ताकद काय, आपली किंमत किती, आपण बोलतो काय याचे भान उंदराला नसते, आणि सगळे राज्य टाळ्या वाजवत असते. नेमके खडसे आणि त्यांच्या कुटुंबियांचे, एकनाथ आणि रोहिणी यांना प्रांजलच्या या वागण्याचे किंचितही दुःख नाही, आश्चर्य अजिबात वाटलेले नाही, कारण खेवलकर आणि खडसे कुटुंबियांचे गावातले मुक्ताईनगरचे गेले अनेक वर्षे अतिशय नाजूक संबंध, अवघ्या गावाला माहीत आहेत. गेल्या ४० वर्षातल्या या दोन्ही घरातल्या आपापसातल्या गमती जमती गावकरीच अधिक रंगवून सांगतील. त्यामुळे प्रांजल नेमका कसा किंवा दिवंगत निखिल आणि प्रांजल या दोघांच्या वृत्ती आणि व्यसनांमधले साम्य, नेमके कुठे आणि कोणते.. हेही गावकरी किंवा जिल्ह्यातले खडसे कुटुंबाला जवळून ओळखणारे सारेच सांगतील, यात नवल वाटून देऊ नका !

### दुःखाचे, चिंतेचे कारण वेगळेच..

एकनाथजी आणि रोहिणी अस्वस्थ नेमके यासाठी झाले, की यापुढे खरकटे आणि उघडे-नागडेपण हे इतरांना पुराव्यांसहित दिसल्याने यापुढे कसे काय बुवा, त्या गिरीश महाजन यांना ओढूनताणून स्त्रीलंपट ठरवायचे ? त्यावर त्या दोघांचाही चेहरा न दाखवता येणाऱ्या रोगासारखा, त्रस्त झालेल्या पेशंटसारखा दिसू लागला आहे! २६ जुलै नेमकी राज्यासाठी घातवाराची तारीख असावी. हाही प्रकार त्याच तारखेला घडला. पण, पोलिसांनी छापा टाकला तेव्हा पळून गेलेल्या दोघी-तिघीत नेमकी रोहिणी की यामिनी होती..की नव्या नात्यातली एखादी होती, त्यावर पोलीस का मूग गिळून आहेत, हे समजत नाही. त्यांनी त्यावर होकार किंवा नकार कळवावा, म्हणजे मनाचे समाधान होईल. आमदार मंगेश चव्हाण यांचा व्हीडिओ बघा, त्यात त्यांनी अगदी स्पष्ट आरोप एकनाथ खडसे आणि त्यांच्या कुटुंबियांवर केले आहेत.

### समोरच्याकडे एक बोट, स्वतःकडे उरलेली..

खडसे कुटुंबातली एखादीच व्यक्ती सोडल्यास, इतरांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवायला निघालेल्या खडसेंचे महाजनांकडे एक बोट, पण स्वतःकडे उरलेली बोटे आहेत. खडसे यांचे गुरु बाळासाहेब चौधरी यांनी त्यांना एकेकाळी राजकारणात पुढे आणण्यासाठी फार मोठी ताकद दिलेली होती. बाळासाहेब गेले, पण त्यांचे चिरंजीव माजी आमदार शिरीष चौधरी त्यावर कितीतरी किस्से आणि पुरावे जगाला देत आहेत. रोहिणी आणि एकनाथजी यांनी चोपड्याच्या बोरोले कुटुंबावर एकाचवेळी सामुदायिक आत्महत्या करण्याची वेळ आणली होती. अर्थात्, मंदाकिनी म्हणजे एकनाथजींच्या पत्नी सोडल्यास अख्ख्या खडसेंच्या वादग्रस्त कुटुंबावर एखादा केवळ वयस्कांसाठीचा सिनेमा काढता येईल, हा भाग वेगळा!

### दिवटा, व्यसनी, स्त्रीलंपट जावई!

खडसेंच्या या दिवट्या, व्यसनी आणि स्त्रीलंपट जावयाने आणि खडसे कुटुंबीयांनी ज्यापद्धतीने आपल्याच लेवा समाजाला मानसिक त्रास दिलेला आहे, त्या खडसे यांनी वास्तविक स्वतःचे कर्तृत्व बरबटलेले असताना इतरांवर व्यभिचाराचे, भ्रष्टाचाराचे आरोप करू नयेत. त्यांनाच ते राजकीयदृष्ट्या फायद्याचे ठरले असते. पण, आता त्यांनी स्वतःच उरली सुरली लाजलज्जा गमावली असल्याने, यापुढे एकनाथ खडसे यांचे राजकीय पुनर्वसन शंभर टक्के होणे नाही. कदाचित, कुंपणावर बसलेल्या राष्ट्रवादीच्या वादग्रस्त जयंत पाटलांची रोहिणी यांना साथ आणि दाद मिळाली, तर त्या मात्र राज्याच्या राजकारणात पुढल्या शालिनीताई म्हणून राजकारण गाजवून सोडतील, असे समजायला हरकत नाही. पण, जयंत पाटील यांचा भरोसा काय? उद्या भलतीकडे वळला, तर पुन्हा एकदा नव्या नेत्याच्या शोधात रोहिणी यांना उंबरठे झिजवावे लागतील. पण, तडकाफडकी महिलांचे प्रदेशाध्यक्षपद पटकावणाऱ्या रोहिणी यांना जयंत पाटलांचा वरदहस्त होता, म्हणून ते घडून आले, कायम त्यांच्यावर विश्वास ठेवणे म्हणजे 'कॅसिनो' मध्ये जाऊन पैसे जिंकण्याचे स्वप्न बघण्यासारखे आहे !

### एकनाथजींचे उर्मट, उद्धट बोलणे

अगदीच सुरुवातीपासून आधी जळगाव जिल्ह्यात, त्यानंतर राज्याच्या राजकारणात एकनाथ खडसे यांची नकारात्मक भूमिका, उद्धट आणि उर्मट वागणे, बोलणे आणि पैशांच्या मागेच सतत धावणे.. त्यातून सुरुवातीला त्यांना पैसा आणि सत्ता मिळाली. पण, शापही मिळत गेले, ज्यातून खडसे कुटुंब आजच्या तारखेला सर्वार्थाने रस्त्यावर आले आहे. एक पैसा सोडल्यास, जिल्ह्यात आणि राज्यात जो विरोधात जाईल, त्याच्यावर तुटून पडायचे, त्याला संपूर्ण उद्ध्वस्त करायचे, हे यांचे धंदे! पण, जिल्ह्यात त्यांना शेवटी गिरीश महाजन आणि राज्यात देवेंद्र फडणवीस पुरून उरले, आणि येथेच त्यांचे सारे संपले.. होती नव्हती तेवढी हाता पायातील ताकद गेली! अर्थात्, त्यानंतरही जर खडसे शांत भूमिका घेत सकारात्मक पद्धतीने राजकारण खेळले असते, तर फडणवीसांचे मन कर्णासारखे दानशूर आहे, त्यांनी पुन्हा एकवार इतर प्रतिस्पर्ध्यांप्रमाणे खडसेंना जवळ घेत राजकीय जीवनदान दिले असते..

### सून शहाणी निघाली, म्हणून..

नेमकी हीच भूमिका त्यांच्या सुनेने घेतली, रक्षा खडसे आज केंद्रात मंत्री आहेत. पण, रोहिणी आणि एकनाथजी बदलायला तयार नाहीत. शेतकऱ्याच्या दृष्टीने म्हातारा बैल दावणीवर बसला आहे आणि त्याचा करंटा जावईसुद्धा त्याला आणखी खड्डयात घालत आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## रमी प्रकरण माणिकराव कोकाटे यांना ऑनलाईन रमी खेळणं भोवलं

# ‘रमी’ प्रकरण खातेबदलावर निभावलं!

| मुंबई |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनावेळी सभागृहात लक्षवेधी चालू असताना माणिकराव कोकाटे त्यांच्या बाकावर बसून मोबाइलवर ऑनलाइन रमी (पत्त्यांचा खेळ) खेळत असल्याचा कथित व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यांच्या या व्हिडीओनंतर विरोधकांनी सरकारविरोधात टीकेची झोड उठवली होती. त्यानंतर माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. अखेर माणिकराव कोकाटे यांना ऑनलाईन रमी खेळणं चांगलंच भोवलं आहे.**

## कृषीखातं काढून ‘क्रीडा’ दिलं!



माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषीखातं काढण्यात आलं असून दत्तात्रय भरणे यांच्याकडील क्रीडा आणि युवक कल्याण खात्याची जबाबदारी आता माणिकराव कोकाटे यांच्याकडे देण्यात आली आहे. तर दत्तात्रय भरणे यांच्याकडे आता कृषीखातं देण्यात आलं आहे. दरम्यान, माणिकराव कोकाटे यांचं ‘सभागृहात रमी’ प्रकरण फक्त खातेबदलावर निभावल्यामुळे पुन्हा एकदा विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यावरून आता पुन्हा राजकारण तापण्याची शक्यता आहे.दरम्यान, माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषीखातं काढून घेत या खात्याची जबाबदारी आता दतात्रय भरणे यांच्याकडे देण्यात आल्यामुळे आता दतात्रय भरणे राज्याचे नवे कृषीमंत्री असणार आहेत. तसेच माणिकराव कोकाटे आता राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री असणार आहेत. या संदर्भातील वृत्त एएनआयने एक्सवर (ट्विटर) दिलं आहे. विधानसभेच्या अधिवेशनादरम्यान सभागृहात लक्षवेधी चालू असताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे त्यांच्या बाकावर बसून निवांतपणे मोबाइलवर ऑनलाइन रमी (पत्त्यांचा खेळ) खेळत असल्याचा कथित व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यानंतर माणिकराव कोकाटेंनी स्पष्टीकरण देताना म्हटलं होतं की, “माझ्या मोबाइलवर गेमचं पॉप अप आलं होतं जे मी स्किप करत होतो” असा दावा कोकाटे यांनी केला होता.

महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनावेळी सभागृहात लक्षवेधी चालू असताना माणिकराव कोकाटे त्यांच्या बाकावर बसून मोबाइलवर ऑनलाइन रमी (पत्त्यांचा खेळ) खेळत असल्याचा कथित व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यांच्या या व्हिडीओनंतर विरोधकांनी सरकारविरोधात टीकेची झोड उठवली होती. त्यानंतर माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. कोकाटे म्हणाले होते, “फोन नवीन असल्यामुळे मला लगेच स्किप करता आलं नाही आणि तेवढ्यात कोणीतरी व्हिडीओ चित्रित करून तो व्हायरल केला. मी सभागृहात ऑनलाइन रमी खेळत नव्हतो. त्यामुळे मी राजीनामा देण्याचा प्रश्नच येत नाही”, असं म्हणत माणिकराव कोकाटे यांनी टीकाकारांना प्रत्युत्तर दिलं होतं. माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषीखातं काढण्यात आलं असून दत्तात्रय भरणे यांच्याकडील क्रीडा आणि युवक कल्याण खात्याची जबाबदारी आता माणिकराव कोकाटे यांच्याकडे देण्यात आली आहे. तर दत्तात्रय भरणे यांच्याकडे आता कृषीखातं देण्यात आलं आहे.

दरम्यान, माणिकराव कोकाटे यांचं ‘सभागृहात रमी’ प्रकरण फक्त खातेबदलावर निभावल्यामुळे पुन्हा एकदा विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यावरून आता पुन्हा राजकारण तापण्याची शक्यता आहे.दरम्यान, माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषीखातं काढून घेत या खात्याची जबाबदारी आता दतात्रय भरणे यांच्याकडे देण्यात आल्यामुळे आता दतात्रय भरणे राज्याचे नवे कृषीमंत्री असणार आहेत. तसेच माणिकराव कोकाटे आता राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री असणार आहेत. या संदर्भातील वृत्त एएनआयने एक्सवर (ट्विटर) दिलं आहे कोकाटे त्यांच्या बाकावर बसून निवांतपणे मोबाइलवर ऑनलाइन रमीखेळत असल्याचा कथित व्हिडीओ व्हायरल झाला.

### कोकाटेंनी स्पष्टीकरण दिलं

त्यानंतर माणिकराव कोकाटेंनी स्पष्टीकरण देताना म्हटलं होतं की, “माझ्या मोबाइलवर गेमचं पॉप अप आलं होतं जे मी स्किप करत होतो” असा दावा कोकाटे यांनी केला होता. कोकाटे म्हणाले होते, “फोन नवीन असल्यामुळे मला लगेच स्किप करता आलं नाही आणि तेवढ्यात कोणीतरी व्हिडीओ चित्रित करून तो व्हायरल केला. मी सभागृहात ऑनलाइन रमी खेळत नव्हतो.

# विरोध झाल्यावर माझ्यातील माणूस जागा

## अण्णा डांगे यांच्या भाजप प्रवेशावर जयंत पाटील यांची प्रतिक्रिया

| मुंबई |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**माझा एक दोष आहे, समोरून जोपर्यंत विरोध होत नाही, तोपर्यंत मी शांत असतो. ज्यावेळी विरोध सुरू होतो, त्यावेळी माझ्यातील मूळ माणूस कार्यप्रवण होतो, अशी प्रतिक्रिया माजी मंत्री आमदार जयंत पाटील यांनी ज्येष्ठ नेते अण्णा डांगे यांच्या भाजप प्रवेशानंतर व्यक्त केली.**



आमदार पाटील यांनी बुधवारी सायंकाळी आयर्विन नवीन पुलाच्या कामाची पाहणी केली, यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी माजी मंत्री डांगे यांच्या भाजप प्रवेशाबाबत काय वाटते, असे विचारले असता, आमदार पाटील म्हणाले, जे फुटणार आहेत, ते फुटतच राहतील, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाबरोबर ज्यांना थांबायचे आहे ते थांबतील, यावर मी काय बोलणार? मुख्यमंत्री मंत्र्यांची पाठराखण करत आहेत, सरकारमधील कोणताही मंत्री काहीही बोलू दे, काहीही करू दे, मुख्यमंत्र्यांना ते मान्य असते, असेच सध्या दिसत आहे. यामुळे कृषी मंत्री कोकाटेंसह इतरांच्या केवळ राजीनाम्याचा विषय नाही, तर सरकार जनतेसमोर कसे हवे, हे मुख्यमंत्र्यांनी जातीने पाहायला हवे, असे आपणास वाटते.राज्यातील पाच लाख ठेकेदारांची सुमारे ९० हजार कोटींची देयके थकली आहेत. ठेकेदारांवर शासनाची दहशत आहे. हर्षल पाटील याने आत्महत्या देयके रखडल्यानेच केली हे स्पष्ट आहे. केवळ तांत्रिक कारणे पुढे करून सरकार वेळ मारून नेत आहे. आयर्विन पुलाला समांतर पूल उभारणीचे काम महाविकास आघाडी सरकारच्या काळात सुरू झाले. काम पूर्ण होण्यास विलंब झाला असला तरी येत्या पंधरा दिवसांत हे काम पूर्ण होवून सांगलीकरांसाठी पूल खुला होईल, असेही त्यांनी सांगितले.

### ज्यांना थांबायचे ते थांबतील

आमदार पाटील यांनी बुधवारी सायंकाळी आयर्विन नवीन पुलाच्या कामाची पाहणी केली, यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी माजी मंत्री डांगे यांच्या भाजप प्रवेशाबाबत काय वाटते, असे विचारले असता, आमदार पाटील म्हणाले, जे फुटणार आहेत, ते फुटतच राहतील, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाबरोबर ज्यांना थांबायचे आहे ते थांबतील, यावर मी काय बोलणार?

**गोयलांचं विधान** राष्ट्रीय हित रक्षणासाठी सर्व आवश्यक पावले उचलणार

# अमेरिकेचा भारतावर टॅरिफ बॉम्ब!

## केंद्र सरकार काय निर्णय घेणार?



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ संदर्भातील धोरणाची जगात मोठी चर्चा सुरू आहे. ट्रम्प यांनी अनेक देशांवर मोठ्या प्रमाणात आयातशुल्क लावल्यामुळे अनेक देशांना मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. यातच डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर देखील १ ऑगस्टपासून तब्बल २५ टक्के टॅरिफ आणि त्यावर अतिरिक्त निर्बंध लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ निर्णयाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांच्या या टॅरिफचा भारतावर काय परिणाम होणार? तसेच ट्रम्प यांच्या या निर्णयानंतर भारत काय भूमिका घेणार? केंद्र सरकार नेमकी कोणते पावलं उचलणार? भारत या संदर्भात काही निर्णय घेणार का? याविषयीची सरकारची भूमिका केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी आज संसदेत बोलताना स्पष्ट केली आहे. अमेरिकेने लादलेल्या २५ टक्के टॅरिफबाबत केंद्र सरकार परिणाम तपासत असून आम्ही राष्ट्रीय हिताचे रक्षण करण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलणार असल्याचं मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे.केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटले की, “सरकार अलीकडील घटनांचा परिणाम तपासत आहे. आम्ही आमच्या राष्ट्रीय हिताचे रक्षण करण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलू. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय निर्यातदार, उद्योग आणि सर्व भागधारकांशी चर्चा करत आहे. या मुद्द्यावरील त्यांच्या मूल्यांकनाची माहिती गोळा करत आहे.

शेतकरी, कामगार, उद्योजक, उद्योगपती, निर्यातदार, एमएसएमई आणि औद्योगिक क्षेत्रातील भागधारकांच्या कल्याणाचे रक्षण करण्यास सरकार सर्वोच्च प्राधान्य देते. आम्ही आमच्या राष्ट्रीय हिताचे रक्षण करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व पावले उचलणार आहोत”, असं ते म्हणाले. या संदर्भातील वृत्त एएनआयने एक्सवर दिलं आहे.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यानी बुधवारी (३० जुलै) मोठी घोषणा केली. त्यांनी म्हटलं आहे की येत्या १ ऑगस्ट २०२५ पासून भारताला २५ टक्के टॅरिफ (आयात शुल्क) भरावं लागेल. ट्रुथ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर त्यांनी एक पोस्ट करून यासंबधीची माहिती दिली. ट्रम्प यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की भारत व अमेरिका मित्र राष्ट्रे असूनही गेल्या काही वर्षांमध्ये उभय देशांमध्ये फारसे व्यावसायिक व्यवहार झालेले नाहीत.”अमेरिकेने २५ टक्के टॅरिफ लादल्यानंतर भारताने प्रत्युत्तर दिलं. या संदर्भात भारत सरकारने एक प्रेस निवेदन जारी करत म्हटलं की, भारत सरकारने द्विपक्षीय व्यापाराबाबत अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या विधानाची दखल घेतली आहे. अमेरिकेच्या २५ टक्के टॅरिफच्या परिणामाबाबत सरकार अभ्यास करत आहे. सरकारने म्हटले आहे की, “भारत आणि अमेरिका गेल्या काही महिन्यांपासून निष्पक्ष, संतुलित आणि परस्पर फायदेशीर द्विपक्षीय व्यापार करारावर पोहोचण्यासाठी वाटाघाटी करत आहे. आम्ही या उद्दिष्टासाठी वचनबद्ध आहोत.” “तसेच सरकार आपल्या शेतकरी, उद्योजक आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या कल्याणाचे रक्षण करण्यास सर्वोच्च महत्त्व देतं. युकेसोबतच्या व्यापक आर्थिक आणि व्यापार करारासह इतर व्यापार करारांच्या बाबतीत जे केलं गेलं आहे तसं सरकार आपल्या राष्ट्रीय हितांचं रक्षण करण्यासाठी आवश्यक ते सर्व पावले उचलेल”, असं निवेदनात म्हटलं आहे.दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांच्या या टॅरिफचा भारतावर काय परिणाम होणार? तसेच ट्रम्प यांच्या या निर्णयानंतर भारत काय भूमिका घेणार? केंद्र सरकार नेमकी कोणते पावलं उचलणार?

### भारतावर २५ टक्के टॅरिफ

भारत या संदर्भात काही निर्णय घेणार का? याविषयीची सरकारची भूमिका केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी आज संसदेत बोलताना स्पष्ट केली आहे. अमेरिकेने लादलेल्या २५ टक्के टॅरिफबाबत केंद्र सरकार परिणाम तपासत असून आम्ही राष्ट्रीय हिताचे रक्षण करण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलणार असल्याचं मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे.

# मला काही फरक पडत नाही : ट्रम्प

## भारत आणि रशियाने मिळून दोघांच्या अर्थव्यवस्था बुडवाव्यात



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल भारतावर २५ आयात कर लागू केला आहे. यानंतर काही तासांतच डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि रशियातील व्यापार आणि संबंधांवर टीका केली आहे. ही टीका करताना त्यांनी म्हटले आहे की, “मला काही फरक पडत नाही, भारत आणि रशियाने मिळून दोघांच्या अर्थव्यवस्था बुडवाव्यात.”**

डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशल हँडलवर एका पोस्टमध्ये लिहिले आहे. ते म्हणाले की, “भारत रशियासोबत काय करतो याची मला पर्वा नाही. ते त्यांच्या मृत अर्थव्यवस्था एकत्रितपणे बुडवू शकतात, मला फक्त काळजी आहे. आम्ही भारतासोबत खूप कमी व्यापार केला आहे;

त्यांचे कर खूप जास्त आहेत, जगातील सर्वाधिक आहेत. त्याचप्रमाणे, रशिया आणि अमेरिका एकत्र जवळजवळ कोणताही व्यवसाय करत नाहीत.”ट्रम्प यांनी १ ऑगस्टपासून भारतीय वस्तूंवर २५ टक्के आयात शुल्क लावण्याची घोषणा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी भारतावर टीका केली. त्यांनी रशियाकडून भारताच्या लष्करी उपकरणे आणि ऊर्जा खरेदीचा उल्लेख करत, भारताच्या संरक्षणवादी धोरणांमुळे आणि अत्याधिक आयात शुल्कांमुळे अमेरिकेला भारतासोबत तुलनेत कमी व्यापार करावा लागतो, असे म्हटले. या कारणांमुळे भारत-अमेरिकीच्या व्यापारात अडथळे निर्माण झाल्याचेही त्यांनी नमूद केले.भारतावर २५ टक्के कर लादल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी जाहीर केले की, त्यांच्या प्रशासनाने पाकिस्तानसोबत एक करार केला आहे. या कराराद्वारे दोन्ही देश इस्लामाबादच्या तेलसाठ्यांचा विकास करण्यासाठी एकत्र काम करणार आहेत.

### भारत-रशिया संबंधांवर आक्षेप

ट्रुथ सोशलवरील एका पोस्टमध्ये ट्रम्प म्हणाले की, “आम्ही नुकताच पाकिस्तानसोबत एक करार केला आहे, ज्याद्वारे पाकिस्तान आणि अमेरिका तेलसाठे विकसित करण्यासाठी एकत्र काम करतील.”पाकिस्तानबरोबरच्या कराराची घोषणा करण्यापूर्वी ट्रम्प यांनी भारतीय उत्पादनांवर २५% शुल्क लावण्याची घोषणा केली होती. त्यावेळी त्यांनी असेही सांगितले.

## राखीला अटक होण्याची शक्यता

बॉलिवूडची 'ड्रामा क्वीन' राखी सावंत (RAKHI SAWANT) नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. पण आता अभिनेत्रीच्या अडचणीत वाढ झाली आहे. 'ड्रामा क्वीन' राखी सावंतला कोणत्याही क्षणी अटक होऊ शकते. अभिनेत्रीला अटकपूर्व जामीन देण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. खासजी आणि आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केल्याप्रकरणी विभक्त पती आदिल खान दुर्रानीने (ADIL KHAN DURRANI) राखी सावंत विरोधात तक्रार दाखल केली होती. पण आता ड्रामा क्वीनला अटकेपासून दिलासा देण्यास दिंडोशी सत्र न्यायालयाने नकार दिला आहे. अभिनेत्री राखी सावंत सोशल मीडियावर चांगलीच ॲक्टिव्ह आहे. काही दिवसांपूर्वी तिने विभक्त पती आदिल खान दुर्रानीचा एक खासजी आणि आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला होता. बदनामी करण्याच्या हेतूने राखीने व्हिडीओ शेअर केल्याचा दावा आदिलने केला होता. आदिल दुर्राणीने राखी सावंत विरोधात अंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. आदिलच्या तक्रारीनुसार पोलिसांनी राखी सावंतवर गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर अभिनेत्रीने अटकपूर्व जामिनासाठी दिंडोशी न्यायालयात धाव घेतली. आपल्याला खोट्या प्रकरणात सामील केले जात असून त्रास देण्याच्या उद्देशाने गुन्हा दाखल केल्याचा दावा 'ड्रामा क्वीन'ने केला होता. पण राखीने अटकपूर्व जामिनासाठी केलेला अर्ज दिंडोशी न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीकांत भोसले यांनी फेटाळला आहे.

## तेजस्विनी पंडित साकारतेय 'स्वराज्य कनिका

राष्ट्रमाता, राजमाता जिजाबाई शहाजीराजे भोसले... यांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी करून या मुलुखाला छत्रपती शिवाजी महाराज दिले .बुद्धिमत्ता, चातुर्य, पराक्रम, शौर्य, दूरदृष्टी, कुशल राजनिती, कुटुंबवत्सल असे सगळेच गुण त्यांच्यात होते. शिवबाचे शिवराय घडवताना या माऊलीने अनेक वादळं पेलली. पण, या वादळात ही तेजस्वी ज्योत आणखी प्रखर झाली. प्रत्येक कसोटीवर खऱ्या उतरून या माऊलीने स्त्रीशक्ती व मातृशक्तिचे चिरंतन उदाहरण आपल्या सर्वांस दिले. जगाला दिशा देणाऱ्या या जगत्जननीच्या आयुष्यावर आधारित 'स्वराज्य कनिका जिजाऊ' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच 'स्वराज्य कनिका जिजाऊ' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली असून या चित्रपटात जिजाऊंची भूमिका मराठी अभिनेत्री तेजस्विनी पंडित ( TEJASWINI PANDIT ) साकारणार आहे. या चित्रपटाचे पोस्टर झळकले असून राजमाता जिजाऊ यांची करारी मुद्रा यात दिसत आहे. चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन अनुजा देशपांडे या करत आहेत. दिग्दर्शिका अनुजा देशपांडे म्हणाल्या की, "राजा नंतर घडतो, आधी घडते ती राजमाता" राजमाता जिजाऊसाहेब या लोकजीवनाला जोडणारी अस्मिता तर आहेतच पण त्याचबरोबर मराठी माणसाला त्याच्या अस्तित्वाची-सामर्थ्याची जाणीव करून देणारी एक शक्ती आहेत. हा अभिमान व जाणीव उराशी बाळगून वीरकन्या ते वीरमातेच्या जीवनकाळचे कथानक २-२.३० तासात मांडणे एक लेखिका म्हणून माझ्यासाठी आव्हानात्मक होते.

## तमन्ना महेश बाबू एकत्र

बॉलिवूडच्या झगमगत्या जगात भारतातील स्टार तमन्ना भाटिया आणि महेश बाबू ही डायनॅमिक जोडी एकत्र स्पॉट झाली. एका सेट वर हे दोघ एकत्र सोबत दिसले हे क्षण काही लोकांनी कॅप्चर केले आणि ज्यामुळे चाहते आणि फिल्म इंडस्ट्रीत एक वेगळा उत्साह निर्माण झाला आहे. लोकांमध्ये वेगळीच उत्सुकता या नंतर बघायला मिळतेय. अपवादात्मक ऑन-स्क्रीन केमिस्ट्रीसाठी ओळखल्या जाणाऱ्या या जोडीने यापूर्वी यशस्वी प्रोजेक्ट्स केले आहेत. आता हे दोघे पुन्हा एकत्र काम करणार का? काही नव्या प्रोजेक्टमध्ये सोबत दिसणार का? अशा प्रश्नांना उधाण आलं आहे. व्हायरल फोटो आश्वासक ऊर्जा आणि इंडस्ट्रीतसोबत सहकार्याबद्दल अंदाज व्यक्त करत आहेत. सूत्रांनुसार "तमन्ना आणि महेशची केमिस्ट्री जादुई आहे प्रत्येक सोबतीचा प्रोजेक्ट्स सिनेमॅटिक अनुभव देणारा असतो यात शंका नाही. त्यांच्या येणाऱ्या प्रकल्पाचे तपशील गोपनीय असून येणाऱ्या काळात हे दोघे सोबत काम करतील. "सोशल मीडियावर याची अधिकृत घोषणा होण्याची सगळेच आतुरतेने वाट पाहत आहेत. तमन्ना भाटिया आणि महेश बाबू यांच्या सहकार्याभोवती सुरू असलेल्या चर्चांना उधाण तर आलं आहे आणि सिनेमॅटिक अनुभव अनुभवयाला सगळेच उत्सुक आहेत.



## मिस्ट्री मॅनसोबत दिसली ड्रामाक्वीन

बॉलीवूड ड्रामाक्वीन कंगना राणौत मुंबईतील सलूनमधून बाहेर पडताना दिसली. यावेळी अभिनेत्री एका मिस्ट्री मॅनसोबत (KANGANA RANAUT WITH MYSTERY MAN) होती. यावेळी कंगनने अतिशय सुंदर स्काय ब्लू कलरचा स्कर्ट तसेच गॉगल घातला होता. तिच्यासोबत दिसणारा रहस्यमय माणूस हा परदेशी होता. दोघेही एकमेकांचे हात घट्ट पकडून सलूनच्या बाहेर आले. त्यानंतर हे फोटो वणव्यासारखे व्हायरल झाले. मिस्ट्री मॅनसोबत अभिनेत्री कंगनाचे हे फोटो पाहून लोक या फिल्म स्टारच्या लिंकअपबद्दल अंदाज बांधताना दिसत आहेत. कंगना मिस्ट्री मॅनसोबत सलूनमधून बाहेर पडताना दिसल्यानंतर लिंकअपच्या बातम्या तीव्र झाल्या. यावेळी या मिस्ट्री मॅनने अभिनेत्री कंगना राणौतचा हात घट्ट पकडला होता. दोघेही चाहत्यांना कपल वाइब्स देताना दिसले. हे फोटो पाहिल्यानंतर सर्वजण अंदाज लावत आहेत की अभिनेत्री कंगना रणौत परदेशी पुरुषाच्या प्रेमात पडली आहे. चित्रपट स्टार कंगना राणौत या मिस्ट्री मॅनसोबत जोडी करताना एकदम परफेक्ट दिसत होती. दोघांचे हे फोटो येताच व्हायरल होऊ लागले. यावेळी पापाराझी पाहून अभिनेत्री कंगना राणौतला लाज वाटू लागली. अभिनेत्रीचे हे फोटोज वाऱ्यासारखे व्हायरल होत आहेत. अनेकदा मीडिया कर्मचाऱ्यांशी मोकळेपणाने बोलणारी अभिनेत्री कंगना रणौत यावेळी पापाराझींना टाळताना दिसली. अभिनेत्री कंगना राणौतचे हे फोटो पाहून तिचे चाहते यावेळी खूप खूश आहेत. या फोटोंवर कमेंट करताना लोकांनी लिहिले, 'राणीला राजा मिळाला आहे.' कंगनाचे तिच्या मिस्ट्री मॅनसोबतचे हे फोटो पाहिल्यानंतर अनेक लोक अंदाज लावत आहेत की ही अभिनेत्री लवकरच लग्न करू शकते. अभिनेत्री कंगना राणौतचे हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागले आहेत. लोक या फोटोंवर जोरदार कमेंट करत आहेत.

## 'ॲनिमल'मुळे तृप्तीला मिळाली लोकप्रियता

संदीप रेड्डी वंगा (SANDEEP REDDY VANGA) दिग्दर्शित ॲनिमल (ANIMAL) या चित्रपटामुळे अभिनेत्री तृप्ती डिमरीला (TRIPTI DIMRI) विशेष लोकप्रियता मिळाली. या चित्रपटामधील तृप्ती आणि रणबीर कपूरच्या इंटिमेट सीन्सनं अनेकांचे लक्ष वेधले. सध्या ॲनिमलचा सक्सेस एन्जॉय करत असणाऱ्या तृप्तीनं काही दिवसांपूर्वी एका इव्हेंटला हजेरी लावली. या इव्हेंटमधील तृप्तीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. अशातच या इव्हेंटमधील एका व्हिडीओनं अनेकांचे लक्ष वेधले. ज्यामध्ये तृप्ती ही ओरीसोबत फोटोसाठी पोज देताना दिसली. AJIO LUXE WEEKEND या इव्हेंटला तृप्ती आणि ओरीनं हजेरी लावली. यावेळी ओरी हा ब्लू डेनिम पँट आणि ऑरेंज टीशर्ट अशा लूकमध्ये दिसला. तर तृप्ती ही पिवळ्या रंगाचा ड्रेस, सिल्वर कलरचे फुटवेअर आणि मोकळे केस अशा लूकमध्ये दिसली. ओरी आणि तृप्तीनं फोटोसाठी एकत्र पोज दिल्या. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये दिसले की, ओरी हा तृप्तीला मिठी मारतो त्यानंतर तो तिच्या गालावर किस करतो. ओरी आणि तृप्तीच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला. एका नेटकऱ्यानं व्हिडीओला कमेंट केली, बॉलिवूडमधील अनेक जण ओरीचे फॅन्स आहेत. तृप्ती डिमरीला ॲनिमल या चित्रपटामुळे विशेष लोकप्रियता मिळाली. ॲनिमल हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला. या चित्रपटामधील तृप्ती आणि रणबीरच्या इंटिमेट सीन्सची चर्चा सोशल मीडियावर झाली. एका मुलाखतीमध्ये तृप्तीनं ॲनिमल चित्रपटातील इंटिमेट सीन्सबद्दल सांगितलं. ती म्हणाली, " सेटवर फक्त चार-पाच लोक होते. दर पाच मिनिटांनी ते सर्व लोक मला विचारत होते, 'तू ठीक आहेस ना?' तुला काही हवे आहे का? तुला कम्फर्टेबल वाटत आहे का?' ॲनिमल या चित्रपटाच्या आधी तृप्तीनं 'बुलबुल' आणि 'कला' या चित्रपटांमध्ये काम केलं आहे. ओरीचं खरं नाव ओरहान अवत्रामणी असं आहे. ओरी हा विविध बॉलिवूड पार्ट्यांमधील फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. या फोटोमध्ये ओरी आणि बॉलिवूडमधील अनेक कलाकार दिसतात. ओरी नेमकं काय काम करतो? त्याची लाईफस्टाईल कशी आहे? या सर्व गोष्टींबाबत जाणून घेण्यास नेटकरी उत्सुक असतात.या चित्रपटामधील तृप्ती आणि रणबीर कपूरच्या इंटिमेट सीन्सनं अनेकांचे लक्ष वेधले. सध्या ॲनिमलचा सक्सेस एन्जॉय करत असणाऱ्या तृप्तीनं काही दिवसांपूर्वी एका इव्हेंटला हजेरी लावली. या इव्हेंटमधील तृप्तीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. अशातच या इव्हेंटमधील एका व्हिडीओनं अनेकांचे लक्ष वेधले.



**खेळभावना!** वोक्सला दुखापत; नायरने चौथी धाव घेण्यास नकार दिला

# करुण-सुंदरच्या कृतीने जिंकली मनं!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाचव्या कसोटीत भारताने खराब सुरुवातीनंतर चांगली धावसंख्या उभारण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यामध्ये करूण नायरने मोठी भूमिका बजावली. ओव्हल कसोटीत फलंदाजी करत असलेल्या टीम इंडियाने पहिल्या दिवशी ६ विकेट्स गमावत २०४ धावा केल्या आहेत. दरम्यान करूण नायरने अर्धशतक झळकावत सुंदरसह ५१ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. पण पहिल्या दिवशी करूण आणि सुंदरच्या कृतीने सर्वांची मनं जिंकली आहेत.**

## वोक्सला सीमारेषेजवळ जबर दुखापत



पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या करूण नायरसमोर संघाचे एकामागून एक विकेट्स पडत होते. पण त्याने दुसरं टोक सांभाळून ठेवत धावा काढणं सुरूच ठेवलं. त्रिशतकवीर करूणने ९ वर्षांनंतर कसोटीत अर्धशतक झळकावलं. तर वॉशिंग्टन सुंदरनेही त्याला चांगली साथ देत त्याच्यासह अर्धशतकी भागीदारी रचली आहे. पण यापूर्वी मैदानात एक मोठा प्रसंग घडला.जेमी ओव्हरटनच्या ५७व्या षटकात ख्रिस वोक्सला जबर दुखापत झाली. या षटकातील पाचव्या चेंडूवर करूण नायरने शानदार ड्राईव्ह खेचला आणि वोक्स सीमारेषेच्या दिशेने वेगाने जाणाऱ्या चेंडूचा पाठलाग करत होता. जसा वोक्स सीमारेषेजवळ पोहोचला त्याने डाईव्ह मारून चेंडू वाचवण्याचा प्रयत्न केला. पण सीमारेषेच्या पलीकडे पडताना त्याच्या खांद्याला जबर दुखापत झाली.वोक्स अक्षरशः वेदनेने कळवळत होता. कदाचित त्याचा खांदा सांध्यातून निखळला असल्याची शक्यता आहे. बराच वेळ वोक्स वेदनेने कळवळत होता. तितक्यात फिजिओ पोहोचले. पण वोक्स वेदनेने इतका विव्हळत होता की त्याने खांदा बिलकुल सोडला नाही. फिजिओने त्याच्या टीशर्टनेच त्याच्या हाताला आधार दिला आणि तो मैदानाबाहेर गेला. वोक्सचा चेंडूचा पाठलाग करत असताना करूण नायर आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी ३ धावा आधीच काढल्या होत्या. वोक्सने चेंडू अडवल्यानंतरही टीम इंडिया धावा काढू शकत होती, कारण इतर कोणताच फिल्डर सीमारेषेजवळ नव्हता. पण पडल्यानंतर वोक्सला दुखापत झालेली पाहता करूण नायरने

## सुंदरही धाव न घेताच थांबला

फिजिओने त्याच्या टीशर्टनेच त्याच्या हाताला आधार दिला आणि तो मैदानाबाहेर गेला. वोक्सचा चेंडूचा पाठलाग करत असताना करूण नायर आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी ३ धावा आधीच काढल्या होत्या. वोक्सने चेंडू अडवल्यानंतरही टीम इंडिया धावा काढू शकत होती, पण पडल्यानंतर वोक्सला दुखापत झालेली पाहता करूण नायरने चौथी धाव घेण्यास नकार दिला.

चौथी धाव घेण्यास नकार दिला, सुंदरही धाव न घेताच थांबला. या दोघांनी दाखवलेली खेळभावना पाहून त्यांचं कौतुक केलं जात आहे.चाहत्यांनी सोशल मीडियावर या दोघांच्या कृतीवरून इंग्लंडला टोमणे मारले आहेत. याला खेळभावना म्हणतात, असंही चाहत्यांनी म्हटलं आहे. वोक्सला लवकर बरं होण्यासाठी शुभेच्छा देत या दोघांच्या खेळभावनेचं चाहत्यांनी कौतुक केलं आहे. पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या करूण नायरसमोर संघाचे एकामागून एक विकेट्स पडत होते. पण त्याने दुसरं टोक सांभाळून ठेवत धावा काढणं सुरूच ठेवलं. त्रिशतकवीर करूणने ९ वर्षांनंतर कसोटीत अर्धशतक झळकावलं. तर वॉशिंग्टन सुंदरनेही त्याला चांगली साथ देत त्याच्यासह अर्धशतकी भागीदारी रचली आहे. पण यापूर्वी मैदानात एक मोठा प्रसंग घडला.जेमी ओव्हरटनच्या ५७व्या षटकात ख्रिस वोक्सला जबर दुखापत झाली. या षटकातील पाचव्या चेंडूवर करूण नायरने शानदार ड्राईव्ह खेचला आणि वोक्स सीमारेषेच्या दिशेने वेगाने जाणाऱ्या चेंडूचा पाठलाग करत होता. जसा वोक्स सीमारेषेजवळ पोहोचला त्याने डाईव्ह मारून चेंडू वाचवण्याचा प्रयत्न केला. पण सीमारेषेच्या पलीकडे पडताना त्याच्या खांद्याला जबर दुखापत झाली.वोक्स अक्षरशः वेदनेने कळवळत होता. कदाचित त्याचा खांदा सांध्यातून निखळला असल्याची शक्यता आहे. बराच वेळ वोक्स वेदनेने कळवळत होता.

# क्रिकेटने दिलेल्या दुसऱ्या संधीचं सोनं!

## करूण नायरचं 3147 दिवसांनंतर कसोटीत अर्धशतक

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**'क्रिकेट मला अजून एक संधी दे' म्हणणाऱ्या करूण नायरला अखेरीस क्रिकेटने एक नाही दोन संधी दिल्या. करूण नायरने दुसऱ्या संधीचं सोनं करत संघासाठी महत्त्वपूर्ण खेळी केली आहे. आठ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन केल्यानंतर करूण नायरने कसोटी अर्धशतकं झळकावलं. करूणने तब्बल ३१४७ दिवसांनंतर त्याचं कसोटी अर्धशतक झळकावलं आहे.**



भारतीय संघाने ओव्हल कसोटीतही नाणेफेक गमावली आणि प्रथम फलंदाजीसाठी संघ उतरला. भारताची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. संघाने सुरूवातीलाच दोन्ही सलामीवीरांचे विकेट गमावले. यानंतर शुबमन गिल आणि साई सुदर्शनने भारताचा डाव सावरला.

पण गिलने स्वतः:च्या पायावर कुऱ्हाड मारून घेत धावबाद झाला. त्यानंतर आलेल्या करूण नायरने एका टोकाने संघाचा डाव सावरला. करूण नायरने साई सुदर्शन, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्याबरोबर भागीदारी

## संघासाठी महत्त्वपूर्ण खेळी

शतकांची रांग लावत अनेक विक्रमही आपल्या नावे केले आणि याचाच परिणाम त्याला आयपीएल २०२५ मध्ये संधी मिळाली. ज्यामध्ये त्याने मुंबई इंडियन्सविरूद्ध विस्फोटक खेळी करत पुनरागमनाचा डंका वाजवला.'क्रिकेट मला अजून एक संधी दे' म्हणणाऱ्या करूण नायरला अखेरीस क्रिकेटने एक नाही दोन संधी दिल्या. करूण नायरने दुसऱ्या संधीचं सोनं करत संघासाठी महत्त्वपूर्ण खेळी केली आहे.

रचल्या. करूणच्या समोर एकामागून एक विकेट्स पडत होते. पण करूणने एक टोक सांभाळून ठेवत धावांचा ओघ कायम ठेवला. करूण नायरने संधी मिळताच कमालीचे कव्हर ड्राईव्ह लगावत चौकारांनी धावा केल्या.करूण नायरने ८९ चेंडूत ७ चौकारांच्या मदतीने ५१ धावा करत अर्धशतक झळकावले. करूण नायरने ९ वर्षांनी पुनरागमन करत इंग्लंडविरूद्धचं अर्धशतक झळकावलं आहे. करूणने याआधी २०१६मध्ये इंग्लंडविरूद्ध त्रिशतक केलं होतं. यानंतर त्याने आता २०२५ मध्ये इंग्लंडविरूद्ध अर्धशतक केलंय.करूण नायरने २०१७ नंतर २०२५ मध्ये कसोटीत पुनरागमन केलं आहे.


स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
। दि. 1 ऑगस्ट 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

DYP DR. D. Y. PATIL COLLEGE OF PHARMACY

DR. D. Y. PATIL COLLEGE OF PHARMACY, AKURDI, PUNE

NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

ACCREDITED WITH GRADE A+ NAAC




Institute code : 6371

STUDENT INTAKE

| | |
|---|---|
| D. Pharm | 60 |
| F. Y. B Pharm | 100 |
| Pharm D | 30 |
| Pharm D (PB) | 10 |
| M Pharm ((Pharmaceutics) | 15 |
| M Pharm (Pharmaceutical Quality Assurance) | 15 |
| M Pharm (Pharmacology) | 15 |
| M Pharm (Regulatory Affairs) | 15 |
| M Pharm (Pharmaceutical Chemistry) | 06 |
| M Pharm (Phytopharmacy & Phytomedicine) | 09 |

www.dyppharmaakurdi.ac.in | @dypcopakurdipune

## शिक्षण विश्व: पीसीयूच्या विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय इंटर्नशिपसाठी निवड

# पीसीयूच्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय विद्यापीठात संधी

## कुलगुरु डॉ. गोविंद कुलकर्णी : पीसीयूचे विद्यार्थी मलेशियाला रवाना



। पिंपरी चिंचवड ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट व नूतन ग्रुपच्या पीसीसीओई, पीसीसीओईआर व नूतन अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या अंतिम वर्षातील १,७२२ विध्यार्थ्यांसाठी आतापर्यंत १,५९३ नोकऱ्या मिळाल्या आहेत. येत्या सहा महिन्यात बरेचसे नोकरी मेळावे होणार आहेत अशी माहिती पीसीईटी, नूतनच्या सेंट्रल प्लेसमेंट सेल चे अधिष्ठाता प्रा. डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी दिली.**

पिंपरी चिंचवड:राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील आघाडीच्या तंत्रज्ञान विद्यापीठ तसेच कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम करण्याची आणि औद्योगिक वातावरणाचा अनुभव घेण्याची संधी पिंपरी चिंचवड विद्यापीठातील (पीसीयू) विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे. त्या अंतर्गत मलेशिया मधील युनिव्हर्सिटी टेक्नोलॉजी पेट्रोनास (यूटीपी) येथे टर्म इंटर्नशिप प्रोग्रॅमसाठी पीसीयूच्या विद्यार्थ्यांची निवड झाली हे गौरवास्पद आहे असे पीसीयू चे कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या संगणक अभियांत्रिकीच्या बीटेक मधील चार विद्यार्थ्यांची यूटीपी मध्ये निवड झाली. यामध्ये तन्वी काकडे आणि आर्य भोईटे (अंतिम वर्ष), श्रेया कोळी आणि माहि बेदरे (द्वितीय वर्ष) यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी कुलगुरू डॉ. कुलकर्णी बोलत होते. यावेळी प्र - कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, डॉ. रोशनी राऊत आदी उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले की, यूटीपी विद्यापीठ हे दक्षिण आशियात औद्योगिक क्षेत्रातील संबंधांसाठी प्रसिद्ध आहे. यामुळे विद्यार्थ्यांना नामांकित तज्ज्ञांसोबत काम करण्याची, नाविन्यपूर्ण प्रकल्पांमध्ये सहभाग घेण्याची आणि प्रगत तांत्रिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी व जागतिक औद्योगिक अनुभव मिळेल. ही निवड पीसीयूच्या उत्कृष्ट शैक्षणिक दर्जाची आणि जागतिक स्तरावर उभ्या राहत असलेल्या विश्वासार्हतेची साक्ष देणारी आहे.

प्र - कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे म्हणाले की, ही उल्लेखनीय कामगिरी पीसीइटी आणि पीसीयू इंटरनॅशनल रिलेशन्स ऑफिस आणि स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या सहकार्याने डॉ. करूणा भोसले, डॉ. रोशनी राऊत, प्रा. शितल येवले यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड झाली. या इंटरनशिप मुळे त्यांना मिळणारे जागतिक अनुभव त्यांचा दृष्टिकोन विशाल होऊन उद्योजकीय नेतृत्व विकसित होईल. पीसीयूमध्ये परिवर्तन घडवणारे अनुभव देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

या यशस्वी निवडीद्वारे पीसीयू च्या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्याचे ध्येय गाठणे आणि उद्योजक बनवण्याच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. या यशस्वी विद्यार्थ्यांचे कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, पीसीयू व्यवस्थापन प्रतिनिधी अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



# ‘डीबीटी’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप!

## अतिरिक्त आयुक्तांनी शाळांना अचानक भेट देत केली शालेय साहित्याची तपासणी

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज सकाळी अचानक महापालिकेच्या चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्याची तपासणी केली. यंदाच्या वर्षी मिळालेले साहित्य कसे वाटते, याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियाही त्यांनी जाणून घेतल्या.**



> “ विद्यार्थ्यांना ‘डीबीटी’च्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक साहित्याचा दर्जा तपासणे व विद्यार्थ्यांच्या या साहित्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आज चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली होती. तसेच महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनांचा त्यांना फायदा कितीपत होत आहे? भारत दर्शन सारख्या उपक्रमांची विद्यार्थ्यांना माहिती आहे का? हे जाणून घेण्याचा उद्देशही या भेटीमागे होता. आगामी काळामध्येही अशा प्रकारे अचानक शाळांना भेट देऊन तपासणी सुरू राहतील.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या १४६ शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट मिळाले आहे का, याची तपासणी आता शिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट आज चऱ्होली बु. येथील शाळेला अचानक भेट देत तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचा दर्जा कसा आहे, हे देखील जाणून घेतले.

चऱ्होली बु. शाळेतील जवळपास ९० टक्के विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे कीट मिळाले असल्याचे निर्देशनास आले. तर उर्वरीत विद्यार्थ्यांना अद्याप कीट का मिळाले नाही, याबाबत अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. त्यानंतर तातडीने शैक्षणिक साहित्याचे कीट मागवून घेत विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी सदर शैक्षणिक कीट स्वतःच्या हाताने फोडून त्यामध्ये असणाऱ्या साहित्याची तपासणी जांभळे पाटील यांनी केली. यावेळी काही विद्यार्थ्यांना गणवेश व शूज मिळाले नसल्याचे लक्षात आल्यानंतर जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवसाच्या आत गणवेश व शूज देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर वापर होईल, याची काळजी घेण्याच्या सूचनाही शाळेल्या शिक्षकांना दिल्या.

### शालेय पोषण आहाराची घेतली माहिती

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत देखील अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. तसेच पोषण आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण तपासण्यासाठी तो स्वतः खाऊन पाहिला. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता ही उत्तमच असावी. त्याची वेळोवेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी तपासणी करावी. त्यामध्ये कुठलाही हलगर्जीपणा करू नका, असे निर्देशही त्यांनी दिले.




EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org